लोकमत कोल्हापूर, गुरुवार, दि. ३० मे २०२४



तिसरी घंटा, विवेकानंद कॉलेजच्यावतीने ॲक्टिंग, कास्टिंग आणि ऑडिशन या कार्यशाळेत कास्टिंग डायरेक्टर निरंजन जावीर यांनी मार्गदर्शन केले.

# तरुणाईला अभिनयाचे धडे

## तिसरी घंटा व 'विवेकानंद'चे आयोजन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** अभिनयाची ऑडिशन कशी द्यावी, आपले प्रोफाइल कसे असावे, ते कसे तयार करावे, ऑडिशनचा व्हिडीओ कसा तयार करावा याचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण या क्षेत्रात करिअर करू इच्छिणाऱ्या युवक-युवतींना मिळाले. अनेक युवक युवतींना नाट्य चित्रपट आणि मालिका क्षेत्रात करिअर करायचे असते, पण नेमका मार्ग सापडत नाही, याबाबत त्यांना मार्गदर्शन व्हावे यासाठी तिसरी घंटा आणि विवेकानंद कॉलेजच्यावतीने या दोन दिवसीय ॲक्टिंग, कास्टिंग आणि ऑडिशन या कार्यशाळेचे आयोजन केले होते.

विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या हस्ते कार्यशाळेचे उद्घाटन झाले. त्यानंतर कास्टिंग डायरेक्टर असोसिएट निरंजन जावीर यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी वेड, पानिपत, ठाकरे, इंदोरी इश्क, धर्मवीर अशा प्रसिद्ध चित्रपटांसाठी आणि वेबसिरीजसाठी कास्टिंग डिपार्टमेंट सांभाळले आहे.

अभिनेते आनंद काळे, विवेकानंद कॉलेजच्या श्रुती जोशी, सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. आरिफ महात यांच्या उपस्थितीत कार्यशाळेचा समारोप झाला. समन्वयक अक्षय सुतार, निहाल रुकडीकर, समीर पंडितराव, ओंकार पाटील, श्रीजीवन तोंदले यांनी व्यवस्थापन पाहिले. काफिला थिएटर्स, इव्हॉलवीन मीडिया, अश्वमेध मीडिया, फिल्मस्पेस प्रोडक्शन हाऊस यांचे सहकार्य लाभले. कार्यशाळेत कोल्हापूर जिल्हा, सांगली, सातारा, बारामती, रत्नागिरी, पुणे, धाराशिव, निपाणी येथून शिबिरार्थी सहभागी झाले होते.

सकाळ
कोल्हापूर, गुरुवार, ३० मे २०२४



कोल्हापूर : विवेकानंद कॉलेजमध्ये झालेल्या मार्गदर्शन कार्यक्रमासाठी राज्यभरातून विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

# विवेकानंद कॉलेजमध्ये अभिनय मार्गदर्शन कार्यक्रम

कोल्हापूर, ता. २९ : येथील 'तिसरी घंटा' आणि विवेकानंद कॉलेज आयोजित ॲक्टिंग, कास्टिंग आणि ऑडिशन मार्गदर्शन कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. राज्यभरातील साठहून अधिक जणांनी या कार्यक्रमात सहभाग घेतला.

अनेक तरुणांना नाट्य, चित्रपट आणि मालिका क्षेत्रात करिअर करायचे असते, पण नेमका मार्ग मिळत नाही. या पार्श्वभूमीवर हा कार्यक्रम झाला.

कास्टिंग डायरेक्टर-असोसिएट म्हणून कार्यरत असणारे निरंजन जावीर यांनी या वेळी मार्गदर्शन केले. 'वेड', 'पानीपत', 'ठाकरे', 'इंदोरी इश्क', 'धर्मवीर' अशा प्रसिद्ध चित्रपटांसाठी आणि वेबसीरिजसाठी त्यांनी कास्टिंग डिपार्टमेंट सांभाळले आहे. त्याचे अनुभवही त्यांनी शेअर केले.

प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्‍घाटन झाले. अभिनेते आनंद काळे, श्रुती जोशी, सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ. आरिफ महात आदी उपस्थित होते. समन्वयक अक्षय सुतार, निहाल रुकडीकर, समीर पंडितराव, ओंकार पाटील, श्रीजीवन तोंदले यांनी संयोजन केले. काफिला थिएटर्स, इव्हॉलवीन मीडिया, अश्वमेध मीडिया, फिल्मस्पेस प्रोडक्शन हाऊस यांचे सहकार्य मिळाले.

तरुण भारत संवाद
गुरुवार, ३० मे २०२४



कोल्हापूर : अनिश जाधव याचा सत्कार करताना प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार. सोबत प्रा. एम. ए. कुरणे, प्रा. एस. पी. पंचभाई, प्रा. के. जे. गुजर, प्रा. सुनिता भोसले, आर. बी. जोग आदी.

# अनिशची अमेरिकेतील विद्यापीठात अभियांत्रिकीसाठी निवड

■ विवेकानंद कॉलेजच्या वतीने सत्कार

कोल्हापूर : विवेकानंद महाविद्यालयाच्या १२ वी सायन्समधील विद्यार्थी अनिश जाधव याची अमेरीकेतील विद्यापीठांमध्ये अभियांत्रिकी पदवी शिक्षणासाठी निवड झाली आहे. या निवडीबद्दल त्याचा प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. अनिशला बारावीत ९० टक्के गुण मिळाले आहेत. अनिश जिल्हा व सत्र न्यायाधीश डॉ अनिता नेवसे-जाधव व डॉ. प्रविण जाधव यांचा मुलगा आहे.

जिद्द व चिकाटीच्या जोरावर अनिशने बारावीत ९० टक्के गुण मिळवले आहेत. आता अमेरिकेतील टॉप टेनमधील एका विद्यापीठात अनिशला अभियांत्रिकी शिक्षणासाठी प्रवेश मिळाला आहे. या यशाबद्दल स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्था सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे, संस्थेचे मुख्य